# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१६ / ०९ / २०१६

**१) जंगलात लावलेले टॅब कॅमे—याची चोरी . :—**

दिनांक १० / ०९ / २०१६ रोजी १३.३० ते १४.३० वा. दर. यातील बिट क्रमांक १ कक्ष क्र. ३८७—बी मध्ये वन विभागाने १० टॅब कॅमरे लावले होते. त्यापैकी १ टॅब कॅमेरा कि. १०,००० / —रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने माडगी जंगल शिवार येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी राहुल रंगलाल जाधव वय २८ वर्ष, माडगी जंगल याचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १४ / ०९ / २०१६ रोजी १९..४५ वा. दर. यातील फिर्यादी दिपक सुभाषचंद्र बत्रा वय ३२ वर्ष, रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा यांनी आपली होंडा कंपनीची अॅक्टीवा क्रमांक एमएच ३६ / ई ७६११ किमती २०,००० / —रु. ची ही घरा समोर कम्पाऊंड वॉल समोर उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) थापडबुक्यांनी व काठीने जखमी करुन जातीवाचक शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४ / ०९ / २०१६ रोजी २३.३० वा. दर. यातील फिर्यादी राजेंन्द्र रामकीरण इडपाते वय २१ वर्ष, रा. अंबागड हे गणपती पाहुण जात असता आतील चारही आरोपीतांनी फिर्यादीस हम शिटी बजा रहे है 'तुझे आवाज नही आता क्या ट्रक्टर क्यु नही रोका' असे म्हणुन पवनखारी ते गोबरवाही रोडवर ट्रॅक्टर अडवुन त्यामध्ये असणारे फिर्यादी व सोबत मुकेश गेडाम याला थापडबुक्यांनी व काठीने मारहान करुन जखमी केले. तसेच आरोपी क्र. १ यांनी आपल्या जवळील लोखंडी काता काढुन ट्रॅक्टर मधील लोकांना 'एक—एक करके काट डालुंगा अशी धमकी देवुन गोंडोंमे क्या दम है' असे जातीवाचक शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३४१,३२४,५०६,३४ भांदवि. सहकलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम ३(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास तुमसर उपविभाविगीय पोलीस अधिकारी श्री.साळी साहेब पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करुन अश्लिल शिविगाळ करुन चाकुने दुखापत केले . :—**

दिनांक १४ / ०९ / २०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील फिर्यादी लेखराम परसराम चांदेवार वय ३२ वर्ष, रा. गोंडउमरी हा त्याचे मजुरानसोबत पानटपरीवर बसला असता दोन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस पाहुन परशा चांदेवार यांना अश्लिल शिविगाळ केली व थापड बुक्यांनी मारहान करुन आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीचे डाव्या हातावर चाकुने मारुन दुखापत केल्याने फिर्यादीचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :-

दिनांक १५/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, वरठी, तुमसर, व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२५ लिटर हातभट्टी दारू + सडवा साहीत्य कि. ४३,०८० आणी देशी दारू ११ लिटर ८८० मिली. कि. ३,३०० /-रू. तसेच जुगारातुन कि. १,७८० /-रु. असा एकुण ४८,१६०/-रू. चा माल जप्त करण्यात आला

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.